शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्याबाबतच्या सुरक्षिततेबाबतची करावयाची उपाययोजना.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: शापोआ २००४/(१५५/०४)/प्राशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २२ जुलै, २००४

पहावे :- १) शासन निर्णय ,शालेय शिक्षण विभाग क्रमांक :शापोआ १००२/(१२७५/०२)/प्राशि-४, दिनांक १६ मे, २००२.
२) शिक्षण संचालक(प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे अ.शा.प. क्र.प्राशिसं २००४-०५/ड-५१६/४६९८, दि. २० जुलै, २००४.

**शासन परिपत्रक :-** शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना तांदूळाचे वाटप करण्यात येत होते. पी.यू.सी.एल. विरुध्द केंद्र शासन याचिका क्रमांक १९६/२००१ च्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजवून देण्याचे आदेश दिलेले आहेत. या आदेशानुसार उपरोक्त दिनांक १६ मे, २००२ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या पध्दतीनुसार राज्यात शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजवून देण्यात येत आहे.

२. तामिळनाडू राज्यातील कुंभकोणम् येथे घडलेली दुर्दैवी घटना लक्षात घेता सदर योजनेसंदर्भात सुरक्षिततेचा उपाय / प्रतिबंधात्मक खबरदारी म्हणून खालील उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात येत आहे:-

१) सर्व साधारणपणे ज्याठिकाणी शाळा बहुमजली इमारतीत आहे तेथे अधिक काळजी घेणे आवश्यक आहे.आगीपासून शाळेला सुरक्षित करण्याच्यादृष्टिने बहुमजली इमारतीत आवश्यकतेनुसार अग्निरोधक यंत्रणा ठेवण्यांत यावी. अग्निशामक यंत्रे घेण्यास ४ टक्के सादिल तसेच वेतनेतर अनुदानातून परवानगी देण्यात येईल.दरवर्षी किंवा नियमितपणे शाळेत अग्निशमन सिलिंडरचे नूतनीकरण करण्यात यावे. सर्वच शाळांमध्ये वाळूच्या बादल्या भरुन आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यास तयार ठेवाव्यांत.

२) शाळेतील वर्गखोल्यांचा स्वयंपाकासाठी वापर करण्यात येऊ नये.स्वयंपाकाची जागा ग्रामीण भागात शाळेच्या इमारतीपासून किमान १०० फूट दूर असावी.

३) शाळेच्या इमारतीत ज्वालाग्राही पदार्थ ठेवण्यात येऊ नये. तसेच स्वयंपाकासाठी लागणाऱ्या इंधनाचा उदा.लाकडे, रॉकेल, गॅस सिलिंडर यांचा साठा शाळेत ठेऊ नये.

४) शिक्षकांना सुरक्षिततेचे प्रशिक्षण सिव्हिल डिफेन्स,होम गार्ड यांच्यामार्फत आयोजित करण्यात यावेत.

५) बालवीर, वीरबाला यांचे प्रशिक्षण सहशालेय उपक्रमामध्ये आगीच्यावेळी करावयाच्या उपाययोजनेसंबंधित इतर सहशालेय उपक्रमामध्ये अशा प्रशिक्षणाचा व माहितीचा उपयोग करावा.

६) इमारतीस आग लागणे,भूकंप होणे, छत वा भिंत कोसळणे इत्यादि परिस्थितीत विद्यार्थ्यांनी काय करावे इत्यादिसाठीच्या सूचना शाळेतील भिंती फलकावर लावाव्यांत व विद्यार्थ्यांना समजावून सांगाव्यात. यात प्रथमोपचाराचाही समावेश असावा.

७) जिल्हा परिषदेच्या शाळा इमारत दुरुस्तीसाठी २० टक्के सादिलवार तरतूदीतून पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. जिल्ह्यांतील शाळा दुरुस्तीच्या गरजा लक्षात घेऊन दुरुस्तीचे काम प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे.

८) आयुक्त, महानगरपालिका यांनी याबाबत स्वतंत्रपणे आदेश काढून संबंधितांना आवश्यक त्या सूचना द्याव्यांत.

शिक्षण संचालक (प्राथमिक ),महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी यासंदर्भात सर्व संबंधितांना आवश्यक त्या सूचना त्वरित द्याव्यांत व सर्व संबंधितांकडून वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

बिवासुतार

( बि.वा.सुतार )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति
शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे .
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्यमंडळ, शिवाजीनगर,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक ), जिल्हा परिषदा.
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई( उत्तर/ दक्षिण / पश्चिम ),
आयुक्त/ शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
आयुक्त / शिक्षण उपसंचालक, नवी मुंबई महानगरपालिका,नवी मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
निवड नस्ती,प्राशि-४ .